निशाणी क्र.१९

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ चा सरतपासः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – रामेश्वर सखाहरी गणगे,

वय – ३४ वर्षे, व्यवसाय– शेती,

राहणार – सुरेगाव, ता. नेवासा, जि. अहमदनगर

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस. के. साबळे यांचे मार्फत सुरू–**

१. घटना दिनांक २३.१०.२०२३ रोजी मुकुंदपुर शिवरात अग्रवाल काट्याच्या समोर दुपारी ०४.०० वाजेच्या सुमारास घडली. तेव्हा मी व राहूल नवनाथ गणगे असे अहमदनगर कडे मोटारसायकल क्र. एम.एच. १७ बी. आर. ६७९६ यावरून जात होतो. मोटारसायकल मी चालवित होतो. त्यावेळी विरुध्द दिशेने भरधाव वेगाने जॉन डिअर कंपनीचा हिरव्या रंगाचा ट्रॅक्टर येत होता. त्या ट्रॅक्टरने आमच्या मोटारसायकलला धडक दिली व त्यानंतर तो ट्रॅक्टर निघून चालला होता. मी खाली पडलेलो होतो. रामेश्वर चिंधे व राहूल यांनी ट्रॅक्टर अडवला. ट्रॅक्टर चालकाने त्याचे नाव सुर्यकांत भानुदास शिरसाट असे सांगितले. माझ्या मानेला, तोंडाला गंभीर दुखापत झाली होती. लोकांनी मला आत्मदीप हॉस्पीटल मध्ये दाखल केले. तेथे मी दहा दिवस उपचार घेतला. घरी आल्यानंतर मी दिनांक ०४.११.२०२३ रोजी नेवासा पोलीस ठाणे येथे फिर्याद दिली. सदर अपघात हा ट्रॅक्टर चालकाच्या निष्काळजीपणामुळे घडला होता. आता मला फिर्याद दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. २०** देण्यात येते. मी दवाखान्यामध्ये उपचार घेत असल्यामुळे मला फिर्याद देण्यास उशिर झाला. दिनांक ०५.११.२०२३ रोजी पोलीसांनी घटनास्थळी पंचनामा केला. घटनास्थळ मी स्वतः दाखलवले होते. ट्रॅक्टर चालकाला पाहिल्यास मी ओळखू शकतो. तो आज रोजी न्यायालयात हजर नाही. (आरोपी न्यायालयात हजर आहे.)

सरतपास पूर्ण

उलटतपास आरोपीतर्फे ॲड. जी. एम. निकम यांच्या मार्फत सुरू–

२ हे म्हणणे खरे आहे की, नगर ते संभाजीनगर हा दक्षिणोत्तर हायवे आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या रस्त्याच्या पुर्वेला अग्रवाल वजनकाटा आहे. हे म्हणणे खरे आहे की, रस्त्याच्या पश्चिम बाजूला बरीच दुकाने, हॉटेल आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे त्याठिकाणी गर्दी असते. हे म्हणणे खरे आहे की, तेथे वजनकाट्याकडे जाण्यासाठी डिव्हायडर तोडलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या रस्त्यावर कायम वाहनांची गर्दी असते. हे म्हणणे खरे नाही की, तो ट्रॅक्टर सुर्यकांत भानुदास शिरसाट चालवित होता हे मी खोटे सांगत आहे.

३. अपघातानंतर तेथे ३० ते ४० लोक जमा झाले होते. राहूल गणगे व रामेश्वर चिंधे या दोघांनी मला दवाखान्यात ॲडमीट केले. तेथे हजर असलेल्या इतर लोकांना मी ओळखत नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०५.११.२०२३ नंतर पुन्हा पोलीस माझ्याकडे आले नाहीत. मी अपघातानंतर उपचार घेवून घरी येईपर्यंत कोणत्याही नातेवाईकाला अपघाताबद्दल सांगितले नाही. हे म्हणणे खरे नाही की, विरुध्द बाजूने भरधाव वेगाने जॉन डिअर कंपनीचा ट्रॅक्टर आला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, अपघातानंतर तो ट्रॅक्टर निघून चालला होता, मी खाली पडलेलो होतो, रामेश्वर चिंधे व राहूल यांनी ट्रॅक्टर अडवला, ट्रॅक्टर चालकाने त्याचे नाव सुर्यकांत भानुदास शिरसाट असे सांगितले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०५.११.२०२३ रोजी पोलीस पंचनाम्यासाठी आले होते व मी स्वतः त्यांना घटनास्थळ दाखवले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, ट्रॅक्टर चालकाच्या निष्काळजीपणामुळे अपघात झाला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी स्वतःहून गाडीवरून पडलो व नुकसान भरपाई मिळण्यासाठी या आरोपीविरुध्द खोटा गुन्हा दाखल केला.

हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खाटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

**स्वाक्षरीत/–**

**(संध्या यु. सुळ)**

दिनांक–२१/११/२०२५.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२),नेवासा